RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ९ ] शुक्रवार, ऑक्टोबर ८, २०२१ / आश्विन १६, शके १९४३ [ पृष्ठे २

## असाधारण क्रमांक ९

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

**जिल्हा पुणे**

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ अन्वये कलम १९ चे पोट-कलम* (१) *अन्वये घोषणापत्र.*

*घोषणापत्र*

क्रमांक भूसंपादन/एसआर-०२/२०२१.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, पुणे यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक भूसंपादन/एसआर-०२/२०२० पुणे, दिनांक १३ ऑक्टोबर २०२० अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-एक पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २२-२८, २०२० मध्ये प्रसिद्ध करणेत आली आहे ; आणि याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, पुणे यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ चे पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या उक्त जमिनीची अनुसूची दोनमध्ये नमूद उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये वर्णन केलेप्रमाणे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाही म्हणून बाधित पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये वर्णन केलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे, जिल्हा पुणे, पत्ता-पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, स. नं. २३, बावधन बु., तालुका मुळशी, जिल्हा पुणे-४११ ०२१ यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

## जिल्हा पुणे, तालुका मुळशी, गाव वाकड

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | मोजणीनुसार संपादन क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ (चौ. मी.) | ४ स. नं. | ५ स. नं. | ६ स. नं. | ७ स. नं. |
| १ | १५९/८/१ पैकी, १५९/८/२ पैकी | ०१.०० | १६० पैकी | १५९/७ | पाणंद | १६४ |
| २ | १६०/७ पैकी | १६०.०० | १६३ | १५९/८ | पाणंद | १६४ |
| ३ | १६०/६ पैकी | १७९.०० | १६३ | १५९/८ | पाणंद | १६४ |
| ४ | १६०/५ पैकी | ३०६.०० | १६३ | १५९/८ | पाणंद | १६४ |
| | **एकूण ..** | **६४६.००** | | | | |

## अनुसूची- दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** हिंजवडी ते शिवाजीनगर, पुणे मेट्रो लाईन - ३ या प्रकल्पाकरिता.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : विशेष सार्वजनिक वाहतुकीचा पायाभूत सुविधा प्रकल्प.

**समाजाला होणारे लाभ** : हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

## अनुसूची - तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

## जिल्हा पुणे, तालुका मुळशी, गाव वाकड

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|

उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत.
सबब, पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे.

## अनुसूची - चार

## (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश वर्णन निरंक असे.

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे, या कार्यालयाचा पत्ता : पत्ता-पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, स. नं. २३, बावधन बु., तालुका मुळशी, जिल्हा पुणे-४११ ०२१ येथे निरीक्षण करता येईल.

**डॉ. राजेश देशमुख,**
(भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, ६ ऑक्टोबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.